# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०९/०४/२०१९

## दि.०८/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे १४०/१९,भादविक १४१,१४३,१४७,१४९,४४७,४४८,४५२,३२३,५०६ |
| **फिर्यादी** | लक्ष्मण दवे,वय-४५,रा.बुधवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | प्रतुल रामचंद्र भाडळे,वय-३५,रा.संगमवाडी,खडकी,पुणे (अटक) इतर चार इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०४/२०१९ रोजी ११/०० वा. १४१३,कसबा पेठ,पुणे येथील रामदेव ट्रेडर्स या दुकानात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे रामदेव ट्रेडर्स नावाचे दुकानात असताना,यातील नमुद इसमाने गैर-कायदयाची मंडळी जमवुन,फिर्यादी यांचे दुकानात शिरुन हे दुकान आम्ही खरेदी केले आहे असे सांगुन,फिर्यादीस जबरदस्तीने दुकानातुन बाहेर काढुन,त्यांना मारहाण करुन फिर्यादी यांचे दुकानाचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. व्हि.ए.तावडे ९७०२००७५५० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २३२/१९,भादविक १४३,१४४,१४७,१४८,१४९,३२४,३५२,३२३,५०४,मु पो ॲक्ट ३७(१)(३)सह १३५ आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | अन्वर इनामदार,वय-३० वर्षे,रा.सैय्यदनगर,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | एकुण १० ते १२ इसम,सर्व रा.सैय्यदनगर मंहमदवाडी रोड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०४/२०१९ रोजी १९/०० वा. ससाणे लॉन्सचे समोर हॉटेल सुब्हानअल्ला हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे हॉटेल सुब्हानअल्ला येथे चहा पीत असताना,यातील नमुद इसम अफान इनामदार व सुफियान इनामदार यांचेसोबत १६/०० वा.प्रचार रॅली मध्ये झालेल्या किरकोळ वादावरुन,त्यांनी व त्यांचे सोबत असलेल्या इतर इसमांनी गैर-कायदयाची मंडळी जमवुन, फिर्यादीस शिवीगाळ करून,त्यांना कोयत्या व हॉकी स्टीकने मारहाण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.डी.वरपडे ९५५२५५७४०५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे ९५/१९,भादविक ३२६,३२३,३२४,५०४,३४,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | राकेश गोरखे,वय-३१,रा.गणेशनगर,एरंडवणे,पुणे |
| **आरोपी** | १.प्रविण विजय सुपेकर,वय-१९ २.भास्कर रावसाहेब सुपेकर,वय-३८,सर्व रा.नेहरू वसाहत, कर्वे रोड,पुणे (अटक) व इतर एक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०४/२०१९ रोजी २१/४५ वा. स्वामी समर्थ मंदिरा जवळ चाळ नं.१०,एरंडवणे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सदर ठिकाणी,स्वामी समर्थ मंदिरात महाप्रसादासाठी गेले असता,यातील नमुद इसमांनी फिर्यादीस "तुला लय माज आला काय" असे म्हणुन फिर्यादी यांना शिवीगाळ व लाथा-बुक्यांनी मारहाण करुन,त्यांचे पोटावर धारदार हत्याराने वार करुन,छातीवर पाडुन गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सुरज गोरे ९९७५०७४०६२ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे १३८/१९,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम,रा.स्वारगेट,पुणे |
| **आरोपी** | एकुण पाच इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे मार्च २०१८ ते आजपोवेतो साततोटी पोलीस चौकी समोर कसबा पेठ,पुणे तसेच स्टेट बँक ऑफ इंडीया टिळक रोड एटीएम समोर,मजुर अड्डा,बुधवार पेठ व स्वारगेट,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करुन,फिर्यादी यांना बांधकामासाठी कमी किंमती मध्ये स्टील देतो असे त्यांना खोटे अमिष दाखवुन,त्यांचा विश्वास संपादन करुन,फिर्यादी यांचेकडुन वेळोवेळी एकुण रोख २७,३०,०००/- रुपये रक्कम घेवुन,फिर्यादी यांना ६० टन स्टिल देतो असे सांगुन,त्यांना स्टील अगर रोख रुपये न देता फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.एच.लिंगे ९५२७६६१०८५ |

**५**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे २१८/१९,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३७,रा.चांदणी चौक,बोपोडी,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जुलै २०१७ ते आजपोवेतो व्हेस्टिरीका असो. ॲण्ड मंगलमय इन्व्हेस्टमेंट,शितल हॉटेल जवळ,एफ.सी.रोड,पुणे |
| **तपशिल** | नमुद इसमाने त्याचे व्हेस्टिरीका असो.ॲड मंगलमय इन्व्हेस्टमेंट याचे माध्यमातुन,फिर्यादीस व इतर २५ व्यक्तींनी केलेल्या गुंतवणुकीवर ७ टक्के व्याजदर होईल,तसेच सदरचे पैसे हे शेअर मार्केट ट्रेडींग कंपनी मध्ये गुंतवुन,त्यातुन मिळणारा नफा हा सरळ बँक खात्यावर ऑनलाईन पध्दतीने जमा होतील. त्याकरीता सुरक्षा म्हणुन त्यांचे फर्म मार्फत गुंतविलेल्या रकमेची सुरक्षा म्हणुन १२ महीन्यांचा उसनवार करारनामा ५०० रूपये दराचे बॉंड पेपरवर लिहुन देवुन, फिर्यादी व साक्षीदार यांचा विश्वास संपादन करुन,त्यांचेकडुन एकुण २,१८,१६,०००/- रुपये घेवुन, फिर्यादी व इतर २५ लोकांची फसवणूक केली आहे. (सदरचा गुन्हा फिर्यादी यांनी केलेल्या तक्रारी अर्जावरून दाखल करण्यात आलेला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एम.चव्हाण ९४२११६८२५७ |

**६**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ३०८/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | सिध्दार्थ रानडे,वय-३३,रा.धायरी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात फेसबुकधारक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०१/२०१९ ते दि.३१/०१/२०१९ रोजीचे कालावधीत फिर्यादीचे राहते घरी फेसबुकवरून ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात फेसबुकधारक इसमाने,फिर्यादी यांना फेसबुक अकाऊंटवर मॅसेज पाठवुन नामांकीत मोटर्स कंपनी येथे नोकरीस लावतो असे सांगून,फिर्यादी यांना सदर इसमाने स्वतःचे बँकेचे खात्यावर पैसे भरावयास लावून,फिर्यादी यांची ४० हजार रूपयेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) के.टी.पाटील ९९२३०७११०० |

**७**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे २०३/१९,भादविक ४२०,४६५,४६७,४६८,४७० |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-६० वर्षे,रा.एन.आय.बी.एम.रोड,कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | एकुण १४ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन १९६७ ते आजपर्यंत महाराष्ट्र कॉस्मो पोलीटन एज्युकेशन सोसा.२३९०,न्यु मोदीखाना, हिदायतुल्ला रोड,कॅम्प,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे महाराष्ट्र कॉस्मो पोलीटन एज्युकेशन सोसा.२३९०,न्यु मोदीखाना, हिदायतुल्ला रोड,कॅम्प,पुणे या नोंदणीकृत संस्थेचे सभासद असुन,सदर संस्थेची स्थापना १९४८ रोजी झाली आहे. यातील नमुद इसम १ ते १४ हे संस्थेचे सभासद असुन,त्यांनी स्वतःचे फायद्यासाठी मुळ सभासद न करता ३३ वर्षापासुन फसवणुक करत आहे. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. व्हि.एन.शिंदे ८३०८३२५१९५ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे २८७/१९,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,रा.सहकारनगर नं.०१,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक पुरूष व महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०७/२०१५ ते दि.०२/०२/२०१९ रोजीचे कालावधीत ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक पुरूष व महिला यांनी संगनमत करून,फिर्यादी यांचे मोबाईल नंबरवरून वेळोवेळी फोन करून,फिर्यादी यांचे बंद पडलेल्या खाजगी दोन नामांकीत कंपनीचे लाईफ इन्सुरन्स या पॉलीसीचे यापुर्वी भरलेले पैस परत मिळवून देतो,तसेच भरलेल्या पैशांचा अधिक परतावा देण्याचे अमिष दाखवून,फिर्यादी यांना इनकम टॅक्स, स्टॅम्प ड्युटी अशी वेग-वेगळी कारणे सांगुन,सदर इसमांचे वेग-वेगळया खात्यामध्ये फिर्यादी यांना पैसे भरावयास लावून,फिर्यादी यांची एकुण ४३,५७,५३८/- रुपयेची आर्थिक फसवणूक केली आहे. (सदरचा गुन्हा फिर्यादी यांनी केलेल्या तक्रारी अर्जावरून दाखल करण्यात आलेला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) व्हि.आर.पुराणिक ९८२३२२६१४५ |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे १७५/१९,भादविक ४०९,४२०,व महाराष्ट्र ओनरशिप ऑफ फ्लॅट ॲक्ट १९६३ चे कलम ३ सह १३(१),५ सह १३(१),४ सह १३(१),१० सह १३(१),११ सह १३(१), १२(अ) प्रमाणे |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३४ वर्षे,रा.साठे वस्ती,लोहगाव,पुणे |
| **आरोपी** | १.बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्सचे को-प्रमोटर तसेच डेव्हलपर्सचे पार्टनर (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे ऑक्टोंबर-२०१० ते आजपर्यंत स.नं.२८८/१+२/२,द व्हिलेज,साठे वस्ती,लोहगाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्सचे को-प्रमोटर तसेच डेव्हलपर्सचे पार्टनर यांनी खरेदी दस्ताप्रमाणे कायदेशीर रित्या फिर्यादी व त्यांचे द व्हिलेज सोसायटी,स.नं.२८८/१+२/२,द व्हिलेज,साठे वस्ती,लोहगाव,पुणे येथील लोकांना फलॅटचा ताबा सन २०११ मध्ये देणार असे सांगितले होते. परंतु फिर्यादी यांना भोगवटा पत्रासह त्यांनी ताबा न देता,ॲग्रीमेन्ट विहित नमून्या मध्ये करुन दिलेले नाही. तसेच ॲग्रीमेन्ट सोबत मा.जिल्हाधिकारी यांनी मंजुर केलेला प्लॉटचा आराखडा ॲग्रीमेन्ट सोबत नोंदणी करुन दिलेला नाही. तसेच सदर बिल्डर / विकसक यांनी फ्लॅट बुकींगच्या वेळी ब्रोशर मध्ये कॉमन ॲमेनिटीज मध्ये मंदिर बांधुन देण्याचे आश्वासन दिलेले असताना,मंदिर बांधुन न देता,फिर्यादी यांचेकडुन सोसायटी रजिस्टर करण्यासाठी, मेन्टेनन्स, लिगल चार्जेस, शेअर्ससाठी,पाईप गॅस,एम.एस.ई.बी. कनेक्शनसाठी आगाऊ घेतलेल्या रक्कमांचे बँकेत स्वतंत्र खाते उघडलेले नाही. तसेच स्टॅम्प डयुटीसाठी जास्त रक्कम घेवुन,कमी किमतीचा स्टॅम्प लावला. त्याचप्रमाणे बिल्डरने अद्यापपर्यंत सहकारी सोसायटी नोंदणीसाठी अर्ज केलेला नसुन,अद्यापपर्यंत फिर्यादीस जमिन व इमारतीचे कन्व्हेयन्स डीड करुन दिलेले नाही. ॲग्रीमेन्टचे पान नं.४५ वर फ्लॅटचा बनावट नकाशा तयार करुन तो खरा असल्याचे भासवून,नोंदणी करुन दिलेला आहे. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी इलेक्ट्रीक बिल न भरल्यामुळे विद्युत वितरण कंपनीने आमचे सोसायटीतील कॉमन इलेक्ट्रीक विद्युत पुरवठा बंद केलेला आहे.सदर बिल्डर/विकसक यांनी माझी व आमचे सोसायटीतील लोकांची फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एम.आर.खोकले ९८५०९०९५५५ |

## दि.०९/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे १७६/१९,भादविक ४०६,४०८,४२० |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४३,रा.पश्चिम ठाणे |

| | |
|---|---|
| **आरोपी** | एक इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१५ ते ऑक्टोबर २०१६ चे दरम्यान True humaniversosty foundation या व्यसनमुक्ती केंद्रात फ्लॅट नं.१९,गल्ली नं.१७,खेसे पार्क,लोहगांव रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे मालकीचे व्यसनमुक्ती केंद्र आहे. तेथे यातील नमुद इसम यास सुपरवायजर म्हणुन नोकरीस ठेवले असताना, व्यसनमुक्ती केंद्रात दाखल होणारे पेशंटची फी व्यसनमुक्ती केंद्राचे नावाने असलेल्या बँक खात्यामध्ये जबाबदारी देवुन नोकरीस असताना,एका पेशंटचे उपचारासाठी दिलेल्या सात महिन्याची फी रोख रक्कम ३,१५,०००/- स्वतःचे नावे कुलाबा शाखेतील बँकेमध्ये स्वतःचे नांवे भरून, व्यसनमुक्ती केंद्रामध्ये दाखल झालेल्या इतर ३४ पेशंटचे नातेवाईकांनी भरलेली फिच्या रकमेचे चेक स्वतःचे वरील बँकेचे खात्यामध्ये भरून,फिर्यादी यांचे व्यसनमुक्ती केंद्राची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. डी.जे.जाधव ९५५२८३४५४७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**